संनियंत्रण प्राधिकाऱ्याची भेट घेईल आणि संनियंत्रण प्राधिकारी बाल न्यायालयाकडे त्याचा अहवाल पाठविल जे प्रत्येक तिमाहीत त्याचे पुनर्विलोकन करील.

**१४. अभिलेख नष्ट करणे**- विधिसंघर्षग्रस्त बालकाबाबत दोषसिध्दीचा अभिलेख अपीलाच्या कालावधी समाप्ती पर्यंत किंवा जास्तीत जास्त सात वर्षाच्या कालावधीसाठी सुरक्षित हवालात ठेवला जाईल. आणि त्यानंतर प्रभारी व्यक्ती किवा मंडळ किंवा यथास्थितीत बाल न्यायालय यांच्याकडून नष्ट करण्यात येईल.

परंतु असे की, अघोर अपराधाच्या प्रकरणात या अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट कलम (१) चा खंड (एक) अन्वये विधिसंघर्षग्रस्त बालक दिसून येत असेल तेथे अशा बालकाचा दोषसिध्दीचा संबंधित अभिलेख बाल न्यायालय ठेवून घेईल.

## प्रकरण ४

## बाल कल्याण समिती

**१५. समितीची रचना व सदस्यांची अर्हता.-**

१) राज्य शासन, उक्त अधिनियमाच्या कलम २७ अन्वये शासकीय राजपत्रातील अधिसुचनेव्दारे प्रत्येक जिल्ह्यात एक किवा अधिक समिती गठीत करेल.

२) राज्य शासन, या नियमांच्या नियम ९० अन्वये,निवड समितीच्या शिफारशीने समितीचे अध्यक्ष व सदस्य यांची नियुक्ती करेल.

३) समाजसेवक सदस्यांचे वय ३५ वर्षाहून कमी नसेल आणि त्याला शिक्षण, आरोग्य व कल्याण कार्याच्या क्षेत्रामधील बालकांसोबत काम करण्याचा किमान सात वर्षाचा अनुभव असेल, आणि शिक्षणशास्त्र, समाजशास्त्र किंवा मानसशास्त्रामध्ये पदव्युत्तर पदवी किंवा एम.बी.बी.एस. किंवा कायद्यातील पदवी अशी शैक्षणिक अर्हता असेल.

४) समितीचे सदस्य कमाल दोन सत्रापर्यंतच्या, जे सलग नसतील, नियुक्तीस पात्र असतील.

५) राज्य शासनाकडून, निवड झालेल्या सर्व व्यक्तींना शक्यतोवर नियुक्तीबाबत अधिसुचनेनंतर ६० दिवसांच्या कालावधीत नियम ९२ अन्वये प्रशिक्षण देणे अनिवार्य राहील.

६) नवनियुक्त सदस्यांना अधिकारपद ग्रहण करण्यापुर्वी समितीचे अध्यक्ष/सदस्य यांचेकडून दिशानिर्देशन मिळेल आणि राज्य शासनाकडून आयोजित केलेल्या पहिल्या प्रशिक्षण कार्यक्रमास ते उपस्थित राहतील.

७) अध्यक्ष व सदस्य यांना आयुक्त,महिला व बाल विकास यांचेमार्फत राज्य शासनाकडे एक महिन्याची लेखी नोटीस देऊन कोणत्याही वेळी राजीनामा देता येईल.यासाठी आयुक्त शासनास शिफारस करतील.

## १६. समितीचे नियम आणि कार्यपध्दती-

१) समिती सदस्यांना प्रत्येक बैठकीसाठी रू.१,५००/- पेक्षा कमी नाही इतका बैठक भत्ता देण्यात येईल. ज्यामध्ये बैठक भत्ता,प्रवास भत्ता आणि अन्य कोणताही इतर भत्ता याचा समावेश असेल.

२) किमान तीन सदस्यांची बालकांची काळजी घेणा-या संस्थेला भेट आयोजित करण्यात येईल. अशा भेटीसाठी अध्यक्षांसह सर्व सदस्यांचा आळीपाळीने सहभाग असेल याची सुनिश्चिती होईल अशा रीतीने अध्यक्षांकडून भेट नियोजित करण्यात येईल. अशी भेट ही समितीची बैठक समजण्यात येईल.या भेटीचा अहवाल आयुक्त, महिला व बाल विकास यांना सादर करण्यात येईल.

३) बाल कल्याण समितीच्या कामाच्या संबंधातील अन्य कोणत्याही अधिकृत प्रयोजनाकरीता प्रवास करणारे सदस्य शासन नियमानुसार विहीत करण्यात येईल असा प्रवासभत्ता व महागाई भत्ता मिळण्यास हक्कदार असतील.

४) समिती आपल्या बैठका बालगृहाच्या परिवास्तूमध्ये किंवा बालगृहाच्या परिसरातील एखादया जागेत किवा काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांच्या अधिनियमान्वये चालविण्यात येत असलेल्या कोणत्याही संस्थेतील योग्य ठिकाणी घेईल.

५) समिती, जेव्हा सत्र चालू असेल तेव्हा कोणतीही व्यक्ती जी प्रकरणाशी संबंधित नाही ती कक्षामध्ये उपस्थित राहणार नाही याची खातरजमा करील.

६) समिती, जिच्या उपस्थितीत बालकाला सोईस्कर वाटेल अशाच व्यक्तींना बैठकीच्या वेळी उपस्थित राहण्याची परवानगी देण्यात येईल याची खातरजमा करील.

७) आणीबाणीच्या कोणत्याही बाबीची दखल घेण्यासाठी आणि जिल्ह्यातील विशेष बाल पोलीस कक्ष किवा स्थानिक पोलिस यांना आवश्यक निर्देश देण्याकरीता समितीचा किमान एक सदस्य नेहमीच उपलब्ध होईल. या प्रयोजनाकरीता समितीचे अध्यक्ष जे रविवार व सुटीच्या दिवशी यासह दररोज उपलब्ध होऊ शकेल आणि सहजरित्या पोहोचू शकेल अशा समितीच्या सदस्यांची दरमहा नामावली

तयार करील. सदस्यांची नामावली सर्व पोलीस ठाणे,मुख्य न्याय दंडाधिकारी ,मुख्य महानगर दंडाधिकारी,जिल्हा न्यायाधीश,जिल्हा दंडाधिकारी,मंडळ, जिल्हा बाल संरक्षण कक्ष आणि विशेष बाल पोलिस कक्ष यांना आगाऊ उपलब्ध करुन देण्यात येईल.

८) एखादया विशिष्ट जिल्हयात प्रलंबित प्रकरणांची संख्या कमी नसेल आणि या संबंधात संबंधित राज्य शासनाने आदेश काढलेले नसतील तर, समिती किमान सहा तासाकरिता सर्व कामकाजाच्या दिवशी बैठक घेईल.

परंतु असे की राज्य शासनास,राजपत्रातील अधिसूचनेव्दारे प्रलंबित प्रकरणांचा यथोचित विचार केल्यानंतर जिल्हयाचे क्षेत्र किवा भूप्रदेश,लोकसंख्या किंवा अन्य कोणत्याही बाबींचा विचार केल्यानंतर एका जिल्हयात एकापेक्षा अधिक समित्या गठीत करता येतील.

९) शक्य असल्यास, बाल कल्याण समितीच्या सदस्यांच्या उपस्थितीची नोंद ठेवण्याकरिता राज्य शासनाकडून बायोमेट्रिक प्रणाली बसविण्यात येईल.

१०) ज्यास समितीपुढे हजर करता आलेले नाही अशा काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालक किवा बालकाबाबतची माहिती प्राप्त झाल्यावर समिती, बालक किवा बालकांपर्यंत पोहोचेल आणि असे बालक किंवा अशा बालकांच्या सोयीच्या ठिकाणी बैठक घेईल.

११) बालकाशी संवाद साधताना समितीतील सदस्य बालकांशी बालकस्नेही वागणुकीच्या तंत्राचा वापर करतील.

१२) समिती, बालकास अनुकूल असलेल्या, जे न्यायालय कक्षासारखे दिसणार नाही अशा जागेत आपल्या बैठका घेईल आणि समितीला बालकांशी समोरासमोर संवाद साधणे शक्य होईल अशी बैठक व्यवस्था करेल.

१३) राज्य शासन, बाल कल्याण समितीची परिवास्तु बालकस्नेही करण्यासाठी स्वतंत्र संवाद कक्ष,प्रसाधन व पाण्याची सुविधा,बालंकासाठी प्रतिक्षा कक्ष, बालकांसाठी बैठक व्यवस्था,प्रथमोपचार,खेळणी आणि वयानुसार उपक्रम पुस्तिका यांची तरतूद करील.

१४) समिती उंच व्यासपीठावर बसणार नाही आणि साक्षीदाराचा पिंजरा किवा समिती आणि बालके यांच्यामध्ये असलेले खांब यांसारखे कोणत्याही प्रकारचे अडथळे असणार नाहीत.

१५) समितीला शासनाकडून पायाभूत सुविधा आणि कर्मचारीवर्ग पुरविण्यात येईल.

१६) राज्य शासन, लेखन सामग्री,संगणक,फर्निचर,इंटरनेट,दूरध्वनी आणि पिण्याचे पाणी इ. किमान आवश्यक सुविधा पुरविण्यात येतील याची खातरजमा करील.

**१७. समितीची अतिरिक्त कार्ये आणि जबाबदाऱ्या**.- अधिनियमाच्या कलम ३० अन्वये समितीची कार्ये व जबाबदाऱ्या याशिवाय समिती अधिनियमाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी पुढील कार्ये पार पाडील-

(एक) समितीशी संबंधित प्रत्येक प्रकरणाच्या सारांशासह **नमुना १५** मध्ये दस्तऐवज आणि तपशीलवार प्रकरणाची नोंद ठेवील;

(दोन) बालकांकडून आणि प्रौढांकडून सूचना व तक्रारी येण्यासाठी समितीच्या जागेत मुख्य ठिकाणी सूचना पेटी किवा तक्रार निवारण पेटी ठेवण्यात येईल.ज्याच्यावर जिल्हा दंडाधिकाऱ्यांकडून किंवा त्याच्या नामनिर्देशितांकडून कार्यवाही करण्यात येईल;

(तीन) बालकांची काळजी घेणा-या संस्थाच्या कारभारात आणि व्यवस्थापनेत बालकांच्या सहभागाची जाणीव होण्याकरिता तिच्या अधिकारक्षेत्रामधील काळजी आणि संरक्षणाची गरज असलेल्या बालकांसाठी उक्त बालकांची काळजी घेणा-या संस्थामध्ये बाल समित्यांची कार्ये सुरळित चालत असल्याची खातरजमा करणे;

(चार) महिन्यातून किमान एकदा बालकांच्या सुचना पुस्तकाचा आढावा घेणे;

(पाच) काळजी आणि संरक्षणाची गरज असलेल्या बालंकाबाबतची त्यांना प्राप्त झालेली तिमाही माहिती **नमुना १६** मध्ये आयुक्त,महिला व बालविकास यांच्यामार्फत जिल्हा दंडाधिकारी व राज्य शासन यांच्याकडे पाठवील.

(सहा) जेव्हा जेव्हा आवश्यक असेल तेव्हा बालकांच्या प्रगतीचे संनियंत्रण करण्यासाठी काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांना **नमुना १४** मध्ये पुनर्वसन पत्रिका तयार करेल.

(सात) एखादया संस्थागत बालकाचे सर्व दस्तऐवज सुरक्षितरित्या वा गोपनीयरित्या ठेवण्यात आले आहेत आणि अशा बालकांची काळजी घेणा-या संस्थेतून बाहेर पडतेवेळी बालकाला किवा पालकांला सुपुर्द करण्यात आलेले आहेत याची खातरजमा करील.

(आठ) नोंदवहीत पुढील अभिलेख ठेवण्यात यावेत,-

क) एका दिवसात आणि नंतरच्या दिनांकास सूचीबध्द केलेल्या प्रकरणांच्या नोंदी आणि पुढील दिनांक आणि समिती तिच्यापुढे आलेल्या प्रकरणांची दैनदिन प्रकरण सूची तयार करील.

ख) समितीसमोर आणलेल्या बालकांच्या नोंदी व त्यांचे तपशील आणि ज्याठिकाणी बालकांना ठेवण्यात आले आहे अशा बालकांची काळजी घेणा-या संस्थेचे तपशील किंवा बालकांना जेथे पाठविण्यात आले आहे तो पत्ता;

ग) हमीपत्राचे निष्पादन;

घ) संस्थेतील भेटींसह इतर कार्यवाही;

ङ) दत्तक ग्रहणासाठी वैधरित्या मुक्त म्हणून घोषित केलेली बालके;

च) प्रायोजकत्वाकरिता शिफारस केलेली किंवा प्रायोजकत्व दिलेली बालके;

छ) वैयक्तिक किंवा समुह प्रतिपालकत्व संगोपनामध्ये ठेवलेली बालके;

ज) दुसऱ्या समितीकडून हस्तांतरीत केलेली किंवा प्राप्त झालेली बालके;

झ) ज्यांचा पाठपुरावा पूर्ण करावयाचा आहे अशी बालके;

ञ) अनुरक्षण सेवेमध्ये ठेवण्यात आलेली बालके;

ट) समितीचा तपासणी अभिलेख;

ठ) समितीच्या बैठकांच्या इतिवृत्ताचा अभिलेख;

ड) प्राप्त झालेला आणि पाठवलेला पत्रव्यवहार;

ढ)समितीस आवश्यक असेल असा कोणताही अभिलेख किंवा नोंदवही;

(नऊ) या नियमांच्या खंड (आठ) मध्ये नमूद केलेली सर्व माहिती अंकीकृत करता येईल आणि त्यासाठई राज्य शासनाकडून सॉफ्टवेअर विकसित करता येईल.

## प्रकरण ५

## काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांसंबंधी कार्यपध्दती

### १८. समितीपुढे हजर करणे.-

१) काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या कोणत्याही बालकास बैठकीच्या ठिकाणी कामाच्या वेळी समितीपुढे हजर करण्यात येईल आणि कामाच्या वेळेव्यतिरिक्त कर्तव्य नामावलीनुसार सदस्यांपुढे हजर करण्यात येईल.